महिलांवर होणा-या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस विभागात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग.

शासन निर्णय क्रमांक : पोपीए १३९४/५/पोल-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २९ सप्टेंबर, १९९५.

वाचावे : १) महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, मुंबई-४०० ०३९ यांचे पत्र क्र. पोमसं/२५/४५/महिला आयोग/१९९४, दिनांक १८ ऑगस्ट, १९९५.

२) शासन पत्र, गृह विभाग, क्र. बीजीटी १०९५/नविन बाबी/भाग-१/बीयुडी-१, दिनांक ३१.७.१९९५.

शासन निर्णय : राज्यातील महिलांवर होणा-या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच बाल वेश्या प्रतिबंध कायदा व अनैतिक व्यवसाय प्रतिबंधक कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. या प्रस्तावास अनुसरुन महिलांवर होणा-या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस विभागात पोलीस उप महानिरीक्षक यांचे नियंत्रणाखाली खालील कर्मचारी-वर्गासह एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

खालीलप्रमाणे कर्मचारी व साधनसामुग्रीस शासन मंजूरी देत आहे. सदर पदे प्रथमत: दि. २९.२.१९९६ पर्यंत चालू राहतील. साधनसामुग्रीचा तपशील सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दिलेला आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	पोलीस उप महानिरीक्षक	[रुपये ५१००-६१५०]	०१
२.	पोलीस उप अधिक्षक	[रुपये २२००-४०००]	०१
३.	कार्यालयीन अधिक्षक	[रुपये १६४०-२९००]	०१
४.	निम्न श्रेणी लघुलेखक	[रुपये १६४०-२९००]	०१
५.	वरिष्ठ लिपिक	[रुपये १२००-२०४०]	०१
६.	कनिष्ठ लिपिक	[रुपये ९५०-१५००]	०२
७.	पोलीस शिपाई [वा. चालक]	[रुपये ८२५-१२००]	०१
८.	चपराशी	[रुपये ७५०-९४०]	०२
		एकूण	१० पदे.

...२/-

- २ -

शासन असेही आदेश देत आहे की, पोलीस उप महानिरीक्षक व संबंधित कर्मचा-यांची पदे ज्या उद्देशांसाठी निर्माण केली आहेत त्याच उद्देशांसाठी त्यांचा उपयोग करण्यात यावा. सदर कर्मचारी वर्ग पोलीस महासंचालकांचे नियंत्रणाखाली राहील.

३. या १० पदांच्या प्रस्तावासाठी आवर्ती खर्च रु. ५,७१,७९६/- व अनावर्ती खर्च रु. ३,४१,४५०/- एकूण रु. ९,१३,२४६/- इतक्या खर्चास शासन मंजुरी देत आहे.

४. यासाठी होणारा खर्च "२०५५ पोलीस-१०९-जिल्हा पोलीस-१०९ [एक] [१] जिल्हा पोलीस दल" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पात नविन बाब भाग १ द्वारा मंजूर करण्यात आलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९३०/९४/व्यय-७, दिनांक २०.१२.१९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ना. ग. [illegible]]
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई [५ प्रतींसह]
विशेष पोलीस महानिरीक्षक, [वाहतूक], महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस उप महानिरीक्षक, विभागीय परिक्षेत्र.
सर्व पोलीस अधिक्षक
पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, पुणे
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा], महाराष्ट्र, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सह संचालक, [स्थानिक शाखा], लेखा व कोषागारे, मुंबई
सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, वित्त विभाग, [व्यय-७], मंत्रालय, मुंबई
उप सचिव, [श्रीमती सां.] पोल-१,
कक्ष अधिकारी, गृह विभाग, कार्यासन:- पोल-१, पोल-३, एसडीओ-४,
अवर सचिव, गृह विभाग, पीपुडी-१,
निवड नस्ती, गृह विभाग [२ प्रतींसह].

परिशिष्ट - अ

शासन निर्णय, गृह विभाग क्र. पोपीए १३९४/५/पोल-८, दि. २२.८.९५ चे सहपत्र

महिलांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येणाऱ्या स्वतंत्र कक्षासह खालील साधनसामग्री खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे.

साधनसामग्रीचे नांव	नगांची संख्या	खर्च
[illegible] जिप्सी	१	२,४०,०००
बिनतारी संच	१	३२,०००
दूरध्वनी	२ [प्रत्येकी १५,०००]	३०,०००
टंकलेखन यंत्र	१	२,०००
फर्निचर		५८,४७०
		३,६२,४७०